राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

शासन निर्णय, क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५

निर्णय

प्रस्तावना

केंद्र शासनाने, त्यांच्या सेवेमध्ये १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना म्हणजेच "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" (Defined Contribution Pension System) शासन अधिसूचना, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, दिनांक २२ डिसेंबर २००३ अन्वये लागू केली आहे. केंद्र शासनाने असेही जाहीर केले आहे की, राज्य शासनांनादेखील वर उल्लेखिलेल्या नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्याचा विकल्प उपलब्ध असेल. त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत निवृत्तिवेतन निधीचे व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी एका स्वतंत्र "निवृत्तिवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाची" (Pension Fund Regulatory and Development Authority) स्थापना केंद्र शासनाने केली आहे.

केंद्र शासनाच्या वरील नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेत नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रश्न या शासनाच्या विचाराधीन होता.

निर्णय

२. **(अ)** शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तिवेतन योजनेऐवजी, केंद्र शासनाच्या धर्तीवर, नवीन **"परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना"** (Defined Contribution Pension Scheme), खाली नमूद केल्यानुसार, लागू करण्यात येईल.

(ब) शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, वरील नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ हे राज्य शासन केंद्र शासनाच्या, वर उल्लेखिण्यात आलेल्या, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होईल.

(क) शासनाने असाही निर्णय घेतला आहे की,

(i) सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४)

आणि

(ii) सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना,

यांच्या तरतुदी, शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होणार नाहीत.

नवीन निवृत्तिवेतन योजनेची ठळक वैशिष्ट्ये

३. नवीन निवृत्तिवेतन योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(अ) या योजनेस "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना "(Defined Contribution Pension Scheme), असे संबोधण्यात येईल.

(ब) ही योजना दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून अंमलात येईल.

(क) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य असेल.

एच१६५० (१३,०००—१०-२००५)

(ड) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना, परिभाषित अंशदानांवर आधारीत असेल आणि या योजनेमध्ये दोन स्तर असतील, ते म्हणजे स्तर-१ (Tier-I) व स्तर-२ (Tier-II).

स्तर-१ हा शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य असेल, तर स्तर-२ त्यांच्यासाठी वैकल्पिक स्वरूपाचा असेल व तो त्यांच्या स्वेच्छानिर्णयाच्या अधिन असेल.

(इ) **स्तर -१ अंतर्गत, प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या " मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता " या रक्कमेच्या १० टक्के इतके मासिक अंशदान द्यावे लागेल.** ही रक्कम प्रत्येक महिन्यात कर्मचाऱ्याच्या वेतन देयकातून वजा करून घेतली जाईल. **राज्य शासन समतुल्य अंशदान देईल.** ही अंशदाने आणि गुंतवणूकीवरील प्राप्तीच्या रकमा, आहरीत करता न येण्याजोग्या (Non-withdrawable) " निवृत्तिवेतन स्तर-१ खात्यामध्ये " जमा केल्या जातील.

(फ) **स्तर -२ अंतर्गत,** प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्याची तशी इच्छा असल्यास, वर उल्लेखिलेल्या, निवृत्तिवेतन स्तर-१ खात्याव्यतिरिक्त " स्वैच्छिक स्तर-२ आहरणयोग्य (withdrawable) खाते " उघडू शकतो. या स्वतंत्र खात्यात कर्मचाऱ्याचे अंशदान जमा केले जाईल आणि शासकीय कर्मचाऱ्यास त्यातील रकमा काढून घेण्याचा विकल्प उपलब्ध असेल. **तथापि शासन या खात्यात कोणतेही अंशदान जमा करणार नाही.**

(ग) शासकीय कर्मचाऱ्यास सर्वसाधारणपणे नियत वयोमान (यथास्थिती, ५८ वर्षे/६० वर्षे) पूर्ण होताच किंवा त्यानंतर नवीन निवृत्तिवेतन योजनेच्या स्तर-१ मधून बाहेर पडता येईल. तथापि या योजनेतून बाहेर पडताना शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या खाती जमा झालेल्या एकूण रकमेच्या ४०% रक्कम (निवृत्तिवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाकडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या जीवन विमा कंपनीकडून) वार्षिकी (Annuity) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य असेल.

शासकीय कर्मचाऱ्याच्याबाबतीत उपरोक्त वार्षिकीमधून, संबंधित कर्मचारी तसेच सेवानिवृत्तीच्यावेळी त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे आई-वडील आणि त्याची /तिचा यथास्थिती, पत्नी/पती यांना हयातभर निवृत्तिवेतन देण्याची व्यवस्था केली जाईल.

शासकीय कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली उर्वरित रक्कम " ठोक रकमेच्या स्वरुपात " संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास प्रदान केली जाईल व तिचा विनियोग कोणत्याही प्रकारे करण्याचे स्वातंत्र्य त्यास असेल.

शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या नियत वयोमानापूर्वी (यथास्थिती, ५८ वर्षे/६० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी) निवृत्तिवेतन योजना सोडून देण्याची मुभा असेल. तथापि, अशा प्रकरणी खरेदी करावयाची अनिवार्य वार्षिकी (annuitisation) शासकीय कर्मचाऱ्याच्या उपरोक्त खाती जमा झालेल्या एकूण रकमेच्या ८०% असेल.

योजनेची व्याप्ती

४. (अ) वर नमूद केल्याप्रमाणे, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होईल.

(ब) शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे इत्यादींच्या सेवेमध्ये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(क) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी देखील वरील निर्णय लागू होतील.

प्रशासकीय विभाग / नियुक्ती प्राधिकारी यांच्यासाठी महत्त्वाच्या सूचना

५. वरील निर्णयाच्या परिणामी,—

(अ) शासन असा आदेश देत आहे की, सर्व संबंधित " सेवा प्रवेश नियमांना " योग्य त्या सुधारणा तातडीने अधिसूचित करण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग तसेच अन्य संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग यांनी त्वरेने पावले उचलावीत.

(ब) शासन असाही आदेश देत आहे की, सामान्य प्रशासन विभाग, अन्य संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, राज्यातील सर्व निवड मंडळे, महाराष्ट्र लोकसेवा आयोग व सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी जे उमेदवार विविध शासकीय आस्थापनांवर १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त केले जाणार आहेत, अशा उमेदवारांना त्वरीत असे **लेखी** कळवावे की,

> **"१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" लागू ठरेल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अशंराशीकरण) नियम, १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही."**

६. देयके काढणे, शासकीय कर्मचाऱ्यांकडून अंशदानाची वसूली करणे, शासनाच्या अंशदानाचे प्रदान करणे इत्यादीबाबत विभाग/कार्यालय प्रमुखांनी/आहरण व संवितरण प्राधिकाऱ्यांनी अंमलात आणावयाची कार्यपद्धती त्याचप्रमाणे लेखाविषयक कार्यपद्धती, निधीच्या व्यवस्थापनासंबंधीची व्यवस्था आणि अभिलेख्यांचे जतन करणे इत्यादीबाबत सविस्तर सूचना लवकरच निर्गमित करण्यात येतील.

७. या आदेशांच्या अनुषंगाने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ तसेच सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीविषयक नियमांना औपचारीक सुधारणा स्वतंत्रपणे करण्यात येत आहेत.

८. हे आदेश शासनाच्या खालील संकेत स्थळांवर (Web sites) उपलब्ध होऊ शकतील :—

(i) finance.mah.nic.in.

(ii) www.maharashtra.gov.in.

९. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नसीमा म. शेख,
शासनाच्या उप सचिव.

प्रति
भारत सरकारचे संचालक, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, (ECB & PR Division), नवी दिल्ली. (५ प्रती)
मुख्य लेखा अधिकारी, बी-ब्लॉक , दिल्ली प्रशासन, विकास भवन, नवी दिल्ली. (५ प्रती)
नियंत्रक, लेखा, परराष्ट्र मंत्रालय, नवी दिल्ली, (१० प्रती)
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (२५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (५० प्रती),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १० प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व उपकोषागार अधिकारी
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, (१० प्रती)
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४, अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हयातील निवड मंडळे,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती),
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

*पत्राद्वारे.

Introduction of New Contribution Pension Scheme for the Government servants who are recruited on or after 1st November 2005 in State Government Service.

GOVERNMENT OF MAHARASHTRA
FINANCE DEPARTMENT,
Government Resolution No. CPS-1005/126/SER-4
Mantralaya, Mumbai 400032
Dated 31st October 2005.

RESOLUTION

INTRODUCTION

Government of India vide Notification, Ministry of Finance, Department of Economic Affairs, dated 22nd December 2003 introduced a new Contribution Pension Scheme i.e. "Defined Contribution Pension System" for the employees who are recruited on or after 1st Jannuary 2004 in Central Government Service. Government of India has also declared that the option of joining the aforesaid new Contribution Pension Scheme would also be available to the State Governments. Besides, under this scheme Government of India have constituted an independent "Pension Fund Regulatory and Development Authority (PFRDA)" for the management and regulation of the pension fund.

The question of introduction of New Contribution Pension Scheme, on the lines of Government of India, for new recruits in State Government service was under consideration of this Government.

RESOLUTIONS

2. (*a*) Government has now decided that a new "**Defined Contribution Pension Scheme**", on the lines of Government of India, replacing the existing pension scheme, as detailed below, would be made applicable to the Government servants who are recruited on or after 1st November 2005 in State Government service,

(*b*) Government is also pleased to decide that for the purpose of implementation of the above new Defined Contribution Pension Scheme, this State Government would join the aforesaid, new defined contribution pension system introduced by Government of India.

(*c*) The Government is also pleased to decide that the provisions of,—

(*i*) the existing pension scheme (i.e. Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984)

and

(*ii*) the existing General Provident Fund Scheme (GPF)

would not be applicable to the Government servants, who are recruited on or after 1st November 2005 in State Government Service.

SALIENT FEATURES OF THE NEW PENSION SCHEME

3. The salient features of the new pension scheme are as under:—

(*a*) This scheme shall be called as " Defined Contribution Pension Scheme".

(*b*) This scheme will come into force with effect from 1st November 2005.

(c) The New Contribution Pension Scheme will be mandatory for all the Government servants who are recruited on or after 1st November 2005 in State Government service.

(*d*) The new contribution pension scheme will be based on defined contributions and will have two tiers, i.e. - Tier-I & Tier-II.

<u>Tier-I</u> will be mandatory for all the Government servants who will be recruited on or after 1st November 2005 in State Government service whereas Tier-II will be optional for them and at their discretion.

(*e*) ***Under Tier-I,*** **every Government servant will have to make a monthly contribution at 10% of his "Basic Pay plus Dearness Pay (if any) plus Dearness Allowance"**, which will be deducted from his salary bill every month. **The State Government will make an equal matching contribution.** The contributions and the investment returns will be kept in a non-withdrawable "Pension Tier-I Account."

(*f*) ***Under Tier-II,*** each Government servant in addition to the above mentioned Pension Tier-I Account, will also have a "Voluntary Tier - II withdrawable Account" at his option. Contribution made by the Government servant will be kept in such separate account and that will be withdrawable at the option of the Government servant. However, **Government will not make any contribution in this account.**

(*g*) A Government servant can normally exit at or after attaining the age of superannuation (i.e. 58 years/60 years, as the case may be) from the Tier-I of the new pension scheme. However, at exit, it would be mandatory for him to invest 40% of the total accumulated pension wealth to purchase an annuity (from Life Insurance Company regulated by Pension Fund Regulatory and Development Authority).

In the case of Government servant, the annuity should provide for pension for the life time of the Government servant and his dependent parents and his spouse at the time of retirement.

The Government servant would receive a lump-sum of the remaining pension wealth, which he would be free to utilise in any manner.

A Government servant would have the flexibility to leave the pension scheme prior to age of superannuation (i.e. 58 years/60 years, as the case may be). However, in this case, the mandatory annuitisation would be 80% of the pension wealth.

APPLICABILITY OF THE SCHEME

4. (*a*) As mentioned above, new defined contribution pension scheme will be applicable to Government servants who are recruited on or after 1st November 2005 in State Government service.

(*b*) Government is also pleased to direct that the above decisions should, *mutatis-mutandis,* apply to the employees, who are recruited on or after 1st November 2005, in the services of the Recognized and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and affiliated Non-Government Colleges and Agricultural Universities etc., to whom the existing pension scheme and General Provident Fund Scheme is applicable.

(*c*) In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishadas and Panchayat Samitis Act 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decisions shall apply to the employees, who are recruited on or after 1st November 2005 in the services of Zilla Parishadas.

IMPORTANT INSTRUCTIONS TO ADMINISTRATIVE DEPARTMENTS/APPOINTING AUTHORITIES

5. Consequent to the above decision,—

(*a*) Government is pleased to direct that General Administration Department and all concerned administrative departments in Mantralaya, should take immediate steps to notify appropriate amendments to all concerned "Recruitment Rules".

(*b*) Government is also pleased to direct that General Administration Department, all other concerned administrative departments in Mantralaya, *all Selection Boards in the State, Maharashtra Public Service Commission and all appointing authorities* should **immediately bring in writing** to the notice of all the candiates, who are to be recruited on various Government establishments, on or after 1st November 2005 that,—

"On their appointment to the Government Service on or after 1st November 2005, they would be covered under new "Defined Contribution Pension Scheme" and that the existing pension scheme (i.e. Maharashtra Civil Services (Pension)Rules, 1982 and Maharashtra Civil Services (Commutation of Pension Rules, 1984) and General Provident Fund Scheme will not be applicable to them."

6. Detailed instructions regarding the procedure to be adopted by Heads of Department/ Offices/Drawing and Disbursing Officers in respect of drawal of bills, recovery of contribution from Government employees, payment of Government contribution, etc., as well as the instructions regarding the accounting procedure, arrangement regarding fund management and record-keeping etc., will be issued shortly.

7. Formal amendments to the Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982, Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984 and General Provident Fund Rules, in terms of the decision contained in this order are being made separately.

8. This order will be available on the following web sites of Government :—

(i) finance.mah.nic.in

(ii) www.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra,

NASIMA M. SHAIKH,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई